| MHBI150016622018 | **नियमीत फौजदारी खटला क्रमांक १०१/२०१८ मधील निशाणी क्र. १८ खालील आदेश** |
|---|---|

[०१] प्रस्तुत अर्ज हा आरोपी क्र.१ ते ४ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४५(१) अन्वये त्यांना प्रस्तुत खटल्यातुन मुक्त करण्याच्या मागणीसह सादर केलेला आहे.

[०२] अर्जाप्रमाणे खबरी ही आरोपी क्र.१ ची कायदेशीर किंवा बेकायदेशीर पत्नी नाही. त्यांच्या दरम्यांन अनैतिक संबंध देखील आले नव्हते व नाही. त्यामुळे खबरीने दाखल केलेली खबर कायद्याच्या चौकटीत बसणारी नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत खटल्यातुन मुक्त करणे गरजेचे आहे. खबरीचा विवाह सन २००१ साली बाबुलाल शेखशी झालेला आहे. त्यांच्या दरम्यांनचे नातेसंबंध आजही कायम आहेत. सदर सर्व बाबी खबरीने बाबुलाल शेख विरुध्द पोटगी मिळणेसाठी दाखल केलेल्या फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३५/२००२ मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत. अशा सर्व परिस्थितीत खबरीने रसीद शेखशी दुसरा विवाह केला. आरोपी क्र.१ समवेत तिचा काहीएक संबंध नसतांना, तिने त्याच्या व इतर आरोपींविरुध्द प्रस्तुत खटल्यातील खोटी खबर दाखल केलेली आहे. खबरीने याच न्यायालयात आरोपी क्र.१ विरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळण्यासाठी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३०/२०१४ दाखल केला होता. सदर अर्जाच्या निकालात या न्यायालयाने खबरी ही आरोपी क्र.१ ची कायदेशीर पत्नी नसल्याचे नमुद करत, तिला पोटगी नाकरलेली आहे. आरोपी क्र.३ च्या नावाची कुठलीही महिला अस्तित्वात नसतांना, तिला आरोपी म्हणुन प्रस्तुत प्रकरणात समाविष्ठ केलेले आहे. अशा सर्व परिस्थितीत आरोपी क्र.१ ते ४ यांना उपरोल्लेखीत मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

[०३] अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, विद्वान विशेष सहाय्यक सरकारी वकिलांनी अर्जास तीव्र विरोध दर्शविला.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे, आरोपींच्या वतीने सादर दस्तऐवजांचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला.

[०६] खटल्यातील गुणवत्ता किंवा इतरत्र पडताळण्यापूर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुत दोषारोपपत्र हे पाटोदा पोलिसांनी खबरीने दाखल केलेल्या खबरीच्या तपासाअंती भारतीय दंड विधान, कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दाखल केलेले आहे. प्रकरण दोषारोपासाठी प्रलबिंत असतांना, आरोपीतांनी प्रस्तुत अर्ज सादर केलेला आहे.

[०७] सर्वप्रथम आरोपी क्र.१ ते ४ च्या वतीने अभिलेखावर सादर करण्यात आलेल्या फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३०/२०१४ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, त्यातील परिच्छेद क्र.२३ मध्ये स्पष्टरित्या खबरी ही आरोपी क्र.१ ची कायदेशीर पत्नी नसल्याची बाब नमुद करत, तिला पोटगी नाकारण्यात आलेली आहे. मुख्यत्वेकरुन त्याचा आधार घेत आरोपींच्या वतीने प्रस्तुत अर्ज सादर करण्यात आलेला आहे.

[०८] सदर मुद्दयाच्या गुणवत्तेला जाण्यापूर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, मा.उच्चतम न्यायालयाने ***अ. सुभाष बाबु वि. आध्रंप्रदेश सरकार***[1] या न्यायनिवाडयात स्पष्टरित्या भारतीय दंड विधान, कलम ४९८अ मधील इतर घटकांची पुर्तता झाल्यास बेकायदेशीर पत्नी देखील त्याखाली खबर दाखल करु शकत असल्याचे स्पष्ट केलेले आहे. म्हणजेच उपरोल्लेखीत केल्याप्रमाणे फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३०/२०१४ मधील न्यायनिर्णयात जरी खबरीस आरोपी क्र.१ ची कायदेशीर पत्नी नसल्याची बाब स्पष्ट केलेली असली, तरी अर्जदार क्र.२ हा आरोपी क्र.१ चा मुलगा असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत उपरोल्लेखीत केलेल्या मा. उच्चतम न्यायालयाच्या न्यायनिवाडयात नमुद केल्याप्रमाणे खबरी प्रस्तुत खटल्यातील खबर दाखल करण्यास सक्षम आहे.

1 (2011) 7 SCC 616.

[०९] अर्जात नमुद उर्वरीत बाबींची सत्यता ही फक्त आणि फक्त संपरिक्षे अंतीच स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे याठिकाणी त्यांचा फार ऊहोपोह करुन काहीएक साध्य होणार नाही. अशा सर्व परिस्थितीत उपरोल्लेखीत कारणांचा व विश्लेषणाचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

(१) निशाणी क्रमांक १८ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

(२) आरोपी क्र.१ ते ४ विरुध्द भारतीय दंड विधान, कलम ४९८अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चीत करण्यात यावा.

(३) दोन्ही बाजुनीं आदेशाची नोंद घ्यावी.

(४) सदरचा आदेश पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आला.

Digitally signed by Pankaj Manmohan Bidada
Date: 2021.03.24 16:46:39 +0530

(पंकज म. बिदादा)

दिनांकः– २३.०३.२०२१. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, पाटोदा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are same word to word, as per the original Order / Judgment.

This order is typed and uploaded by Presiding Officer of this Court.

| | |
|---|---|
| Court | : C.J.J.D. & J.M.F.C., Patoda. |
| Judgment / Order signed by the Presiding Officer on | : 23.03.2021. |
| Judgment / Order uploaded on | : 24.03.2021. |